# द बिशप्स स्कूल, कॅम्प, पुणे

## कनिष्ठ विभाग

## मराठी दिवस वृत्तांत

## २०२३-२४

**ज्ञानदेवांनी रूजविली ती भाषा मराठी**

**शिवरायांनी टिकविली ती संस्कृती मराठी**

**संतांनी वाढविला तो वाण मराठी**

**आमची मायबोली आमचा अभिमान मराठी**

श्रेष्ठ कविवर्य श्री. विष्णु वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस म्हणजे २७ फेब्रुवारी महाराष्ट्रामध्ये मराठी दिवस म्हणून साजरा केला जातो. आपल्या भाषेला गौरव म्हणून आणि कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. यावर्षी ३० जानेवारीला मराठी दिवस मोठ्या उत्साहाने साजरा झाला. सकाळपासूनच संपूर्ण शाळेत उत्साहाचे आणि मराठमोळे वातावरण दिसत होते.






कार्यक्रमाची सुरुवात स्वागत भाषणाने झाली. ज्युनिअर स्कूलच्या मुख्याध्यापिका माननीय मिस बारसे यांनी मराठीतून ईश्वराची प्रार्थना केली. आपले प्राचार्य माननीय श्री. मॅकफरसन सर आणि मुख्याध्यापक माननीय श्री. गेणर सर हे द बिशप्स स्कूलला लाभलेले उत्तुंग नेतृत्व आहेत. मुख्याध्यापक माननीय श्री. गेणर सरांनी आपल्या अभिभाषणातून प्रेक्षकांना अमूल्य मार्गदर्शन केले.



इयत्ता ४ थी आणि ५वीच्या विद्यार्थ्यांनी ‘शहेनशहा’ या विनोदी नाटिकेद्वारे प्रेक्षकांचे मनसोक्त मनोरंजन केले. ‘मी मराठी’ आणि ‘ही मायभूमी, ही जन्मभूमी’ या मनोवेधक नृत्यांद्वारे इयत्ता ४ थी आणि ५वीच्या विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांचे मनोरंजन केले. ' विंचू चावला ' या भारुडाद्वारे महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे अप्रतिम दर्शन इयत्ता ४ थी आणि ५वीच्या विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांना घडवून दिले. इयत्ता १ ली च्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी भाज्या आणि फळांविषयी विनोदी बडबडगीत सादर केले. ‘जयोऽस्तुते जयोऽस्तुते’ या इयत्ता ४ थी आणि ५वी च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या समूहगीताद्वारे सभागृहातील संपूर्ण वातावरण स्वातंत्र्यरसाने आणि देशप्रेमाने भरून गेले. इयत्ता २ री च्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या महत्वाच्या व्यक्तिमत्वांची ओळख करून दिली. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. इयत्ता ३ री, ४ थी आणि ५वीच्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सौ. चारुशीला धुमाळ या पालकांनी आयोजित केलेल्या रांगोळीने सभागृहाची शोभा वाढविली.





आपले प्राचार्य माननीय श्री. मॅकफरसन सर, मुख्याधापक माननीय श्री. गेनर आणि ज्युनिअर स्कूलच्या मुख्याध्यापिका माननीय मिस बारसे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करण्याची संधी दिली म्हणून आम्ही त्यांचे आभारी आहोत. या सर्व मान्यवरांच्या पाठिंब्यामुळे आणि अमूल्य मार्गदर्शनामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला.

सौ. शितल सूर्यवंशी

सहायक शिक्षक, मराठी

ज्युनिअर स्कूल





